भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०७/२०१७

**१) संगनमत करुन ओव्हरटेक केल्याचे कारणावरुन एसटी बस चालकाचे कॉलर पकडुन ओढतान व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०७/२०१७ चे २१.०० वा. दर. यातील फिर्यादी अनमोल लक्ष्मण गभणे वय २९ वर्ष, रा. भगतसिंग वार्ड भंडारा हा आपले एस टी बस क्र. एमएच ४०/८१२२ ने पवनी ते भंडारा कडे प्रवासी घेवुन जात असतांना खापा जंगल डांबरी रोडवर कोसा कंपनी जवळ येवुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन मारोती ओमीनीचा गाडी चालक व ईतर ३ ईसमांनी एस टी बस अडवुन फिर्यादीस आमचे गाडीला ओव्हर टेक का केला असे बोलुन कॉलर पकडुन ओढतान व शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो स्टे भंडारा येथे अप क्र. ००/१७ कलम ३५३,३४१,५०४,५०६,३४ भांदवि. चे कागदपत्र पोस्टे भंडारा येथे प्राप्त सरतर्फे फिर्यादी पोशि. बेदुरकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३५३,३४१,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये नंबरी गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे अडयाळ हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०७/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, ३ महीने ही घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेली कोणीतरी अज्ञात ईसमाने पळवुन नेले असावे असा संशय व्यक्त केल्याने फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**३) महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन ओढतान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/०७/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. पुष्पा राजकुमार कुडमते वय ४६ वर्ष, रा. बाम्पेवाडा ही बाम्पेवाडा गावातील दारुबंदी गटाची सहसचिव असुन गावातील शिला सोपान फुंडेसह दारुबंदी करीता आरोपीचे सार्वजनिक ठिकाणी असलेल्या अंडयाच्या दुकानात गेली असता यातील आरोपीने फिर्यादीला माझ्या दुकानात कशाला आली म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केली व शिला सोपान फुंडे वय ३५ वर्ष, हिचा हात धरुन ओढत नेवुन दरवाज्याजवळ आपटले तिला खर्चटला मार लागल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोडंगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) ६ दिवसाचा नवजात शिशु सिमेंटच्या बंद पिशवीत मारुन टाकण्याच्या उद्देशाने पिशवीत मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/०७/२०१२ चे २१.०० वा दर. यातील कोणीतरी अज्ञात आरोपी आई वडीलांनी त्यांच्या ६ दिवसाचा नवजात शिशुला मारुन टाकण्याच्या उद्देशाने एका पिवळया रंगाच्या सिमेंटच्या खाली पिशवीत बंद करुन फेकुन दिल्याने फिर्यादी यशंवत श्रीराम सोनकुसरे वय ३७ वर्ष, रा. गणेशपुर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे भंडारा येथे कलम ३१५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची, पिठण्याची धमकी देवुन थापड बुक्यानी हातावर,पाठीवर, मानेवर मारल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०७/२०१२ चे १६.४५ वा दर. यातील गोविंद विद्यालय पालांदुर येथील कर्मचारी सहकारी पतसंस्थेमध्ये सहविचार सभा सुरू असतांनी यातील आरोपी हा तेथे आला असता फिर्यादीने सर तुम्ही कनेरीचे शाळा डिजीटल करण्यासाठी वर्गनी देणार होते, वर्गनी आता देता का असे विचारले असता आरोपीने चिडुन फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली तसेच थापड बुक्यानी हातावर, पाठीवर व मानेवर मारल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे पालांदुर येथे कलम २९४,३२३,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोना. चाचेरे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**५) कॅन्डीबॅग कॅमेराची चोरी :-**

दिनांक २२/०७/२०१७ चे ०९.३० ते २४/०७/२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी गोपाल हिरालाल येटरे वय ४२ वर्ष रा. सोनारटोला देवरी जिल्हा गोंदीया ह.मु. कोका वन्यजिव अभयारन्य कार्यालय चंद्रपुर यांचे देखरेखी खाली कार्यक्षेत्रात लावलेला शासकिय कॅन्डीबॅग कॅमेरा क.सी. एच ५००२८१६ कि. १५,८००/रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**६) घराच्या समोरील दाराचा ताला तोडुन सोन्या, चांदीचे दागीने व नगदी पैसाची चोरी. :-**

दिनांक २६/०७/२०१७ चे १७.३० वा. दर. यातील फिर्यादी गुलदास पतीराम शहारे वय ४७ वर्ष रा. बोळदे यांचे घराचे समोरील दाराचा कोणीतरी आरोपीने ताला तोडुन आत प्रवेश करून माचघरात असलेली गोदरेज आलमारीचा लॉकर तोडुन लॉकरमध्ये ठेवलेले काळी पोत यात सोन्याचे गोल मनी व सोन्याचे पदक असलेले वजन १० ग्रॅम एक सोन्याची अंगठी ४ ग्रॅम लहान मुलाची कंठी दिड ग्रॅम, चांदीचे चाळ ७० ग्रम व नगदी ९,०००/रु असा एकुन ४३,५००/रु चा माल चोरून नेल्याने तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे साकोली हे करीत आहेत.

**७) अवैध दारु /जुगार अडयावर धाडी . :-**

दिनांक २७/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, जवाहरनगर, तुमसर, पालांदुर ,कारधा येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून ३२ लिटर हा.भ. दारू किंमती ३,२००/-रु. ८ लिटर ६४० मिलीलीटर देशी दारू कि. २८०/रु तसेच जुगारातुन कि. २३४०/रु असा एकुण ८,४२०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-**

दिनांक २७/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२२ केसेस करण्यात आलेल्या आहे.


सपोनी. पी. के. बोरकुटे

पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी

भंडारा

दुरध्वनी.९६५७४०७१७३


प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.